पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.
क प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्रमांक- ४
स भा वृ त्तां त

दिनांक ७/११/२०१७ वेळ-दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. "क" प्रभाग समिती मासिक सभा मंगळवार दि.७/११/२०१७ रोजी **दुपारी १२.००** वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.अश्विनी संतोष जाधव सभापती
२) मा.सारीका शिवाजी सस्ते
३) मा. राहुल गुलाब जाधव
४) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश
५) मा.लोंढे नम्रता योगेश
६) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
७) मा.गीता सुशिल मंचरकर
८) मा.राहुल हनुमंतराव भोसले
९) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
१०) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

याशिवाय मा.अण्णा बोदडे- क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, मा.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.संजय भोसले- उपअभियंता जलनिस्सारण, मा.नितीन देशमुख- प्र.कार्यकारी अभियंता विदयुत,मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.दवंडे- उपअभियंता पापु, मा. शिंदे, वायकर- उपअभियंता स्थापत्य,मा.बी.बी.कांबळे- सहा.आरोग्याधिकारी, श्री.वसंत उगले- लेखाधिकारी, हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

-----

उपस्थित सन्मा.सदस्य/ सदस्या अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजास सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत येत आहेत.

विषय क्रमांक- १) नामकरण संदर्भात- मा.राहूल भोसले,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- २) प्रभाग क्र.८ मध्ये नामकरण करण्यास मान्यता देणेबाबत-मा.विलास हनुमंतराव मडिगेरी,मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ३) एच.ए.कॉर्नर महिंद्रा सोसा.जवळील चौकास सुशोभिकरण व फलक लावण्यास परवानगी न देणेबाबत- मा.गीता मंचरकर,मा.डॉ.वैशाली घोडेकर ( लोंढे) यांचा प्रस्ताव.

मा.क प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक - २१३ दि.७/१२/२०१६ अन्वये "गांधीनगर पिंपरी येथील नव्याने बांधण्यात येणा-या उदयानास **"कै.महादेव गोविंद कदम उदयान"** याप्रमाणे नांवे देण्यात यावीत. असा ठराव मंजुर झालेला असल्याने मा.क प्रभाग समिती सभा दि.४/१०/२०१७ (कार्यपत्रिका क्र.३) मधील "ठराव क्रमांक-१३ विषय क्रमांक -७ अन्वये **"पिपरी चिंचवड शहरातील खराळवाडी गांधीनगर प्रभाग क्रमांक ९ मधील गार्डन आहे. त्या गार्डनला "कै.हरिश्चंद्र मंचरकर" हे नांव देण्यात यावे"** असा दुबार ठराव मंजुर झाला असल्याने ठराव क्रमांक -१३ दिनांक ४/१०/२०१७ हा संपुर्ण ठराव वगळणेची दुरुस्ती करणेत येऊन त्या दुरुस्तीसह दिनांक ४/१०/२०१७ (कार्यपत्रिका क्रमांक ३) रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत यावा.

**मा.सभापती-** मा.क प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक - २१३ दि.७/१२/२०१६ अन्वये "गांधीनगर पिंपरी येथील नव्याने बांधण्यात येणाऱ्या उदयानास **"कै.महादेव गोविंद कदम उदयान"** याप्रमाणे नांवे देण्यात यावीत. असा ठराव मंजुर झालेला असल्याने मा.क प्रभाग समिती सभा दि.४/१०/२०१७ (कार्यपत्रिका क्र.३) मधील "ठराव क्रमांक-१३ विषय क्रमांक -७ अन्वये **"पिपरी चिंचवड शहरातील खराळवाडी गांधीनगर प्रभाग क्रमांक ९ मधील गार्डन आहे. त्या गार्डनला "कै.हरिश्चंद्र मंचरकर" हे नांव देण्यात यावे"** असा दुबार ठराव मंजुर झाला असल्याने ठराव क्रमांक -१३ दिनांक ४/१०/२०१७ हा संपुर्ण ठराव वगळणेची दुरुस्ती करणेत येऊन त्या दुरुस्तीसह दिनांक ४/१०/२०१७ (कार्यपत्रिका क्रमांक ३) रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक - १
दिनांक - ७/११/२०१७ विभाग-
सुचक- मा.राहूल भोसले अनुमोदक- मा.समीर मासुळकर
संदर्भ- मा.राहूल भोसले,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ९ मधील आण्णासाहेब मगर स्टेडियम समोरील सर्व्हे नं.१०९,११० महापालिकेच्या ताब्यात असणारी महापालिकेच्या इमारतीस **"बिनाजी भैरु वाघिरे बहुउद्देशीय इमारत"** असे नामकरण करण्यात यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक - २
दिनांक - ७/११/२०१७ विभाग-
सुचक- मा.विलास मडिगेरी अनुमोदक- मा.नम्रता लोंढे
संदर्भ- मा.विलास मडिगेरी,मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

१) सेक्टर ४ मधील मोतीलाल तालेरा शाळेजवळील दक्षिण- उत्तर रस्त्यांस **"कै.विठोबा महादू बनकर पथ"** २) सेक्टर क्रमांक २ मधील तिरुपती बालाजी चौक पासून ते यशवंतराव चव्हाण चौकास **"मोरया चौक"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक - ३
दिनांक - ७/११/२०१७ विभाग-
सुचक- मा.गीता मंचरकर अनुमोदक- मा.डॉ.वैशाली घोडेकर
संदर्भ- मा.गीता मंचरकर,मा.डॉ.वैशाली घोडेकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ९ मधील एच.ए.कॉर्नर महिंद्रा सोसा.जवळ मासुळकर कॉलनीकडे जाणारा रस्ता व पिंपरी भोसरी मुख्य रस्ता असुन या रस्त्यावर चौक आहे सदरील रस्ता अरुंद असल्याने त्याठिकाणी वाहतुक कोंडी ही होत असते.सदर चौकातील तीन्ही रस्ते अरुंद असल्याने त्या चौकात कोणत्याही प्रकारचे सुशोभिकरण व फलकास परवानगी देऊ नये तसेच रस्ता सोडून फुटपाथ असुन त्याठिकाणी परवानगी देण्यास हरकत नाही. तरी एच.ए.कॉर्नर महिंद्रा सोसा.जवळील चौकास सुशोभिकरण व फलक लावण्यास परवानगी देऊ नये. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

यानंतर सर्वांचे आभार मानून मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/
(**मा.अश्विनी संतोष जाधव** )
सभापती
क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.
क्र-कक्षेका/कावि/ १८/२०१७.

दिनांक- २९/११/२०१७.

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.